# राष्ट्राला एकसंघ ठेवण्याचे काम हिंदी भाषा करते : वैभव शेवाळे

**पाथर्डी । वीरभूमी –**

हिंदी भाषा ही जगात दुसऱ्या क्रमांकावर बोलली जाणारी भाषा असून तिचा वापर जगातील १४४ देशांमध्ये केला जातो. साहित्य समाज निर्माण करण्याचे काम करण्याबरोबरच ते आपल्याला जीवन जगण्याचा मार्ग दाखवते. १९१८ साली म. गांधीजीनी हिंदीला राजभाषा म्हणून मान्यता मिळावी यासाठीचा ठराव हिंदी साहित्य संमेलनात मांडला. पुढे १४ सप्टेंबर १९४९ ला भारतीय संविधानाने हिंदीला भारताची राजभाषा म्हणून मान्यता दिली. तेव्हापासून हा दिवस संपूर्ण भारतात हिंदी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो. प्राचीन संस्कृत भाषेची वंशज म्हणून समजली जाणारी हिंदी भाषा समजण्यास सोपी असून राष्ट्राची संपर्कभाषा म्हणून ओळखली जाते. एकंदरीतच भारताला एकात्मकता प्रदान करण्याचे व एकसंघ ठेवण्याचे काम हिंदी भाषा करते असे प्रतिपादन साहित्यप्रेमी व अभिनेते वैभव शेवाळे यांनी केले.




ते येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात हिंदी दिवस समारोह निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे तर व्यासपीठावर प्रा.रमेश मोरगावकर, हिंदी विभागप्रमुख डॉ. बबन चौरे, पर्यवेक्षक प्रा. शेखर ससाणे, डॉ. अशोक कानडे, संदीप आव्हाड आदी उपस्थित होते.

हिंदी दिवस समारोह निमित्त महाविद्यालयाच्या हिंदी विभागामार्फत निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे बक्षीसवितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. वरिष्ठ महाविद्यालयातून प्रथम क्रमांक मुर्हे ज्ञानेश्वरी, द्वितीय क्रमांक बांगर भाग्यश्री तर तृतीय क्रमांक सोनटक्के गौरव तर कनिष्ठ महाविद्यालयातून प्रथम क्रमांक कोलते माधुरी, द्वितीय क्रमांक दहिफळे पवन तर तृतीय क्रमांक शिंदे प्राजक्ता हिने मिळविला. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते अनुक्रमे एक हजार, ७५० व ५०० रुपये रोख पारितोषिक व प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संयोजन हिंदी विभागप्रमुख डॉ. बबन चौरे, तर आभार प्रा. मोहम्मद सलीम शेख यांनी मानले.